ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

महिला सबलीकरण व महिलांच्या सद्यस्थितीचा अभ्यास

** डॉ. महादेवी वैजनाथ फड व ** डॉ. दिपक एम. भारती*

** कै. शंकरराव गुट्टे ग्रामीण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धर्मापूरी, ता. परळी. जि. बीड .*

*** प्रोफेसर व प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, अर्थशास्त्र संशोधन केंद्र, यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य महाविद्यालय अंबाजोगाई, जि. बीड.*

प्रस्तावना (Introduction):

भारतात एकुण लोकसंख्येच्या ५० टक्के महिला आहेत. महिलांच्या विकासाशिवाय देशाचा विकास अशक्य आहे. आजच्या युगामध्ये स्त्री कल्याण, स्त्री विकासाद्वारे स्त्री सबलीकरण या विचाराला सर्व समाजातून मान्यता मिळत आहे. ज्या समाजातील आणि ज्या राष्ट्रातील स्त्री सक्षम असते ते राष्ट्र आणि तो समाज नेहमीच विकासात पुढे असतो. स्त्री म्हणजे प्रकृती म्हणजेच निसर्गसृष्टी समजले जाते. अनादि काळापासुन स्त्री ही सृष्टीची जननी मानली जाते. पुरातन काळात तर तिला देवता मानले जाईल. समाजाच्या जडणघडणीत तिचे योगदान महत्वाचे आहे. थोर विचारवंत प्लोटोने स्त्रियांना राज्याची आधीशक्ती मानले होते. आज कुटुंब समाज, राष्ट्र व जगाच्या विकासासाठी स्त्री सबलीकरणाचे महत्व वाटू लागले.

भारत सरकारने 2001 हे वर्ष महिला सबलीकरणाचे वर्ष म्हणुन घोषीत केले. स्त्रियांच्या सबलीकरणासाठी राष्ट्रीय धोरण द नॅशनल पॉलिसी फॉर एम्पीवरमेंट ऑफ विमेन हे २००१ मध्ये मंजुर करण्यात आले. महिलांचे सबलीकरण म्हणजे स्त्रियांचे आध्यात्मिक, सामाजिक, राजनैतिक, आर्थिक सामर्थ्य वाढविणे त्यांच्या स्वत: च्या क्षमतेसंबंधी त्यांच्या आत्मविश्वास वाढवणे हा आहे. तसेच भारताने २०११ हे वर्ष महिला सक्षमीकरणाचे वर्ष म्हणुन साजरे केले. या वर्षी देशातील महिलांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या सशक्ता बनवण्यासाठी अनेक प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

Copyright © 2025 The Author(s): This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

गृहितके :

१) महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व कौटुंबिक बाबतीत सुधारणा होत आहे.

२) ग्रामिण महिलांच्या सबलीकरणाच्या दर्जात सुधारणा होताना दिसुन येते.

३) महिला सबलीकरणात शासनाच्या योजनांची अंमलबजावणी प्रभावी आहे.

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025
OPEN ACCESS Original Research Article

संशोधन पद्धती :

शोध निबंधाच्या मांडणीकरिता वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. सदरील शोध निबंधाच्या करीता द्वितीय स्त्रोत संशोधन पद्धतीवर अवलंब करण्यात आला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने विविध संदर्भग्रंथ, मासिके, वर्तमान पत्रातील प्रकशित लेख साप्ताहिके, शासकीय, निमशासकीय अहवाल प्रकशित व अप्रकाशित प्रबंध, इंटरनेट इत्यादीचा अवलंब करण्यात आला आहे.

महिला सक्षमीकरणात महिलांची सद्यस्थिती :

१) सामाजिक क्षेत्रात महिलांची स्थिती :

पूर्वीपेक्षा आज महिलांच्या सामाजिक दर्जामध्ये खुप सुधारणा झालेली दिसते. त्या आधुनिकतेकडे वाटचाल करताना दिसतात. सामाजिक बंधनातुन मुक्त होत आहेत. आज महिलांना हक्क आणि अधिकारा बद्दल जागरुकता निर्माण झाली आहे.

२) शैक्षणिक क्षेत्रात महिलांची स्थिती :

स्वातंत्र्यपूर्व काळात महिलांना शिक्षण घेण्याची संधी नव्हती. पण आज महिलांनी शिक्षणातून खूप मोठ्या प्रमाणात प्रगती केली आहे. १९५१ च्या जनगणनेमध्ये महिलांचे शिक्षणाचे प्रमाण फक्त ८.८६ टक्के होते. १२८ देशापैकी भारत सर्व विकास निर्देशकांत १०५ व्या क्रमांकावर आहे. मानसिक, सामाजिक आणि संरचनात्मक अडथळे दूर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. जेणेकरुन बहुतेक स्त्रिया शिक्षण प्रणालित भाग घेऊ शकतील. आज भारतामध्ये स्त्रियांच्या शिक्षणाचे प्रमाण ७८ टक्के आहे. म्हणुन आज ती प्रशासकीय अधिकारी, वैद्यकिय अधिकारी, अभियंता, राजकीय पदाधिकारी अशा अनेक पदावर काम करीत असल्याचे दिसुन येते.

३) आर्थिक क्षेत्रात महिलांची सद्यस्थिती :

स्वातंत्र्यपुर्वकाळात स्त्रिया ह्या पुरुषांवर अवलंबुन असायच्या म्हणजेच लहान वयात वडिलांवर, विवाह झाल्यावर पतीवर आणि वृद्ध झाल्यावर मुलांवर अवलंबुन असायच्या. पुरुषांनी आर्थिक कामे करावी व महिलांनी चूल आणि मुल सांभाळावी अशी समाजाची पूर्वी अपेक्षा होती. पण आज मात्र स्त्रिया स्वालंबी व आत्मनिर्भर आहेत. आज ती उच्च शिक्षण घेऊन अर्थार्जन करीत आहे. त्यामुळे त्या कोणावरही अवलंबुन नाहीत.

४) राजकीय क्षेत्रात महिलांची सद्यस्थिती :

पूर्वी महिलांना मतदानाचा देखील अधिकार नव्हता पण आज मात्र महिलांना निवडणूक लढवणे, मतदानाचा हक्क बजावणे या प्रकारचे अधिकार प्राप्त झाले आहेत. महाराष्ट्र शासनाने स्थानिक निवडणूकीत महिलांना ५० टक्के आरक्षण दिले आहे. यामुळे तळागळातील महिलांना देखील राजकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी मिळत आहे.

भारतामध्ये २००९ च्या १५ व्या लोकसभा निवडणुकीत ५२ महिला वेगवेगळ्या राजकीय पक्षातुन निवडुन आलेल्या होत्या. २०१४ च्या १६ लोकसभा निवडणुकीत ६४ तर २०१९ च्या १७ व्या लोकसभा निवडणुकीत ७८ महिला खासदार म्हणुन निवडुन आल्या आहेत.

५) कौटुंबिक क्षेत्रात महिलांची सद्यस्थिती :

स्वातंत्र्यपुर्वकाळात भारतामध्ये प्रामुख्याने संयुक्त कुटूंब पद्धती होती. या संयुक्त कुटूंबामध्ये पुरुषी सत्ता होती. परंतू आज भारतामध्ये संयुक्त कुटूंबाचे विघटन होऊन त्यांची

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025
OPEN ACCESS Original Research Article

जागा विभक्त कुटुंबाने घेतली आहे. या कुटूंबात तिची भुमिका दासीसारखी न राहता ती कुटूंबाची प्रमुख बनत आहे. ती आज कुटूंबातील सर्वच निर्णय प्रक्रियेत भाग घेत आहे. म्हणुनच आज तिला कुटूंबात सन्मान मिळत आहे.

स्त्री सबलीकरण आणि शासनाची भुमिका :

१९७५ नंतर काही बदल होऊ लागले. १९७५ ते १९८५ या महिला दशकाच्या कालखंडात मेक्सिको, कोपन हेग, नैरोबी येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदांनी स्त्री चळवळीला बळकटी दिली. या दृष्टीकोनाचा प्रभाव शासनावर पाडण्यात स्त्री चळवळीला यश आले. परिणामी सातव्या योजनेत स्त्रियांचे सक्षमीकरण ही संकल्पना पहिल्यांदा मांडण्यात आली. व पुढील दोन योजनांमध्ये त्याला बळकटी मिळाली. भारत सरकारने २००१ हे वर्ष स्त्रियांच्या सक्षमीकरणाचे वर्ष म्हणुन जाहीर केले.

ज्या संस्कृतीने ज्या देशाने महिलांच्या सबलीकरणाचा मार्ग चा . त्या संस्कृतीने त्या देशाचा सर्वांगीण प्रगती साधली लोकसंख्येमध्ये जवळपास ५० टक्के महिला असताना त्यांच्या उत्कर्षाशिवाय कुटूंबाची, गावाची राज्याची आणि पर्यायाने देशाची प्रगती होणे कठीण आहे. हे ओळखुन महाराष्ट्र शासनाने १९९४ साली महिला सक्षमीकरण व सबलीकरण धोरण आखले. महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले. कालांतराने राष्ट्रीय स्तरावर स्वीकार करण्यात आला. तसेच केंद्रशासनाने महिला सबलीकरणासाठी १ एप्रिल १९९९ पासुन सुवर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार ही महत्त्वकांक्षी योजना सुरु केली. स्वयंसहायता गट या योजनेचा आत्मा आहे. अशाप्रकारे शासनाने महिलांना योजना राबुन स्त्री सक्षमीकरणाला बळकटी देण्याचे काम शासनाने केले आहे.

ग्रामीण महिलांचे सवलीकरण:

ग्रामीण महिलांचे कौटुंबिक आणि समाजातील योगदानांमध्ये सिंहाचा वाटा आहे. पण असे असले तरी त्यांना विकासाच्या संधीमध्ये अतिशय अल्प वाटा मिळतो. बहुतेक वेळा त्यांना शिक्षण त्यांना चांगला नोकऱ्या, राजकीय व्यवस्थेत सहभाग आणि चांगले आरोग्य सेवा, निर्णय घेण्यापासून वगळले जाते. त्याशिवाय त्यांना, शारीरिक मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अडथळ्यांच्या सामना करावा लागतो. की, जे त्यांच्या सक्षमीकरणास अडचण निर्माण करतात. भारतात नियोजनकत्यांनी स्त्री-पुरूष यांच्यामधील दरी कमी करण्याकरिता रणनीती ठरवली. १९५० मध्ये कार्यक्रमाचा दृष्टीकोन झाला. सबलीकरण म्हणजे एखाद्याला सामर्थ्यवान करणे, महिला सबलीकरण हे केवळ सत्तेचे वाटप, पुर्नवाटप किंवा सहभागापुरते मर्यादित नसून त्यामध्ये सामाजिक, आर्थिक व संस्थात्मक बदल होणे अपेक्षित आहे. सबलीकरण ही बदुविध, बहुआयामी व बहुपातळ्या असलेली संकल्पना आहे. सबलीकरणाच्या संकल्पनेमध्ये सत्तेचे न्याय वाटप अपेक्षित आहे.

महिलांच्या आर्थिक सुरक्षेसाठी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेत अनेक तरतूदी आहेत. राष्ट्रीय ग्रामीण उपजिवीका कार्यक्रम म्हणजे एनआरएलएम मध्ये ग्रामीण महिलांना आर्थिक सुरक्षा व सक्षमीकरणाची संधी दिलेली आहे. महिला ई-हाट योजनाही सुरू केली. असून त्यात महिलांच्या उघोजकतोला प्रोत्साहन दिले जाते.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

निष्कर्ष:

१) एकदरीत पाहता सामाजिक, आर्थिक, राजकीय, कौटुंबिक, शैक्षणिक निर्णय घेण्याचा प्रक्रियेत सहभाग वाढलेला दिसून येत आहे.

२) शिक्षण या सामाजिक घटकाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण साघण्याचा यशस्वी प्रयत्न होत आहे.

३) महिलांमधील स्वयंरोजगार ही बाब आज देशाच्या आर्थिक विकासाचा एक मुख्य स्त्रोत म्हणून ओळखली जाते.

४) शिक्षण आणि कामाच्या ठिकाणी महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य राखण्यसाठी.

५) राजकीय सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांना कुटुंबात आणि इतरत्र समान वागणूक मिळावी यासाठी अनेक कायदे संमत करण्यात आले असून अनेक योजनांची अमंलबजावणी करण्यात आली आहे.

उपाययोजना:

१) आजही स्त्री-पुरूष यामध्ये विषमता आहेत. भारतीय समाजव्यवस्थेत आधुनिक काळात स्त्रियांना विविध संधी मिळत असल्या तरी महिलांना समाजात दुय्यम स्थान आहे. तेव्हा सरकारने स्त्री सक्षमीकरणाऱ्यासाठी आणखी कठोर निर्णय घ्यावेत. जेणेकरून महिलांच्या क्षमतेचा पुरेपूर उपयोग करून समाजाची प्रगती अधिक वेगाने होण्यास मदत होईल.

२) महिलांच्या आरोग्याकडे आजही दुर्लक्ष होताना दिसून येते. म्हणून त्यांची आरोग्यविषयक स्थिती सुधारण्यासाठी सार्वजनिक भागीदारीच्या माध्यातून आरोग्यप्रणाली सद्ढ करण्याची अत्यंत गरजेचे आहे.

३) महिलांची आर्थिक सक्षमीकरणाची गती मंद आहे. १/३ महिला पुरूषांवर अवलंबून आहेत. त्यांच्यातील आर्थिक मागासलेपणा दूर करण्यसाठी बचत गटाच्या माध्यामातून प्रयत्न वाढवणे गरजेचे आहेत.

सारांश:

जागतिकरणाच्या या युगात महिलांच्या संदर्भात असणारी 'चूल व मूल' ही संकल्पना आता कालबाहय झालेली आहे. त्या आर्थिकदृष्या स्वतंत्र व स्वालंबी झाल्या असून औपचारिक व अनौपाचारिक कामांमधील महिलांचा सहभाग वाढला आहे. महिला नेतृत्वाची गरज निर्माण झाली आहे. कारण संध्या संपूर्ण जग एका विशिष्ट आहनात्मक अशा स्थित्यंतरांतून जात आहे. महिलांचे नेतृत्व म्हणजे मोठया संख्येने महिला पुढारी तयार होणे. असा अर्थ अभिप्रेत नाही. तर व्यापक अर्थाने सार्वगिक विकासाचा समतोल राखण्याचे आव्हान पैलू शकेले असा, महिला सापेक्ष नेतृत्वाची आज खऱ्या अर्थाने सर्व जगालाच गरज आहे.

संदर्भ सूची:

१) योजना मासिक (ऑक्टोबर २०१८) "महिला सक्षमीकरण" अंक ३

२) शरद जावडेकर, वसुधा जोशी, लता पाघव, रविद्र म्हसदे (२००९) "सामाजिक परिवर्तन: चिकित्सा आणि भवितव्य" प्रकाशन सुगावा प्रथमावृत्ती

३) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, अर्थ व सांख्यिकीय संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई २०१३-१४

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

४) Kabeer, Naila, and Luisa Natali, (2013) General Equality and Economic Growith.

५) डॉ. महाजन वंदना (२०१३) "स्त्रीवाद आणि समाज परिवर्तन, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे.

६) प्रा. डॉ. गायकवाड आर. के (२०१९), "देशाच्या विकासात महिलांचे योगदान (लेख).

७) लोकराज्य मासिक (२०२३) "विकासाचे पंचामृत"

८) heeps://www.loksatta.com.

९) मुलानी एम.यु (२००६) "महिला स्वयंसहाय्यता बचत गट, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

११) https://www.bookganga.com

Cite This Article:

डॉ. फड म. वै. व डॉ. भारती दि. एम. (2025). **महिला सबलीकरण व महिलांच्या सद्यस्थितीचा अभ्यास .** In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal: Vol. XIV (Number I, pp. 122–126).
Doi: https://doi.org/10.5281/zenodo.16419513